# ...शोधली 'बेगोनिया'ची नवी जात

या वनस्पतीचे नामकरण 'बेगोनिया हंडीबडगनाथेंसिस' असे तिच्या मूळ स्थानावरून करण्यात आले. या संशोधनामध्ये डॉ. यु. एस. यादव, डॉ. नीता जाधव, अरुण जाधव आणि डॉ. एस. एस. कांबळे यांचे सहकार्य लाभले. बेगोनिएसी कुळातील बेगोनिया जातीतील वनस्पती शोभिवंत म्हणून प्रसिद्ध आहेत. याच्या जगभरात दहा हजार जाती लागवडीखाली आहेत. अनेक जंगली, लागवडीखालील आणि संकरित वाण शोभिवंत, खाद्य आणि औषधी गुणधर्माचे आहेत. युरोप, जपान, अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया हे देश त्याच्या व्यावसायिक उत्पादनासाठी अग्रेसर आहेत. भारतामध्ये या कुटुंबामध्ये बेगोनिया ही एकच प्रजात असून त्यात ५७ जाती नोंदविल्या आहेत. यापैकी सर्वाधिक जाती हिमालयामध्ये, तर अन्य जाती पश्चिम घाटामध्ये आढळतात. पश्चिम घाटासाठी बेगोनियाच्या १५ जाती डॉ. ऐतवडे आणि प्रा. यादव यांनी नोंदविल्या आहेत.

# वैद्यकीय माहिती व्यवस्थापनात संधी

कोल्हापूर टाइम्स टीम

'सध्याच्या परिस्थितीमध्ये औषध निर्माण क्षेत्रामध्ये व्यवसाय वृध्दींगत करण्यासाठी त्याचबरोबर रोजगार निर्मितीसाठी एम. एस्सी. - मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट हा अभ्यासक्रम अत्यंत उपयुक्त आहे. यात जागतिक करिअरच्या संधी आहेत,' असे प्रतिपादन युनेस्को बायोएथिक्सचे प्रमुख तथा जर्मनी येथील होश्यूल हॅनोव्हर युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाइड सायन्सेस अँड आर्ट्‌सचे प्रा. डॉ. गेरहार्ड फोर्टवेंगेल यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बायोकेमिस्ट्री अधिविभागात एम. एस्सी.- मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट या अभ्यासक्रमाच्या उदघाटनप्रसंगी फोर्टवेंगेल बोलत होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. हॅनोव्हर विद्यापीठाचे डॉ. ज्ञानेश लिमये, पुण्याच्या सीडीजीएमआयचे संचालक प्रा. डॉ. अतुल कापडी, कोल्हापूरच्या मनोरमा इन्फो-सोल्युशनच्या कार्यकारी संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी अश्विनी



प्रा. डॉ. फोर्टवेंगेल

**शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम**

दानिगोंड यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. गेरहार्ड फोर्टवेंगेल म्हणाले, 'मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट या अभ्यासक्रमाअंतर्गत उत्साहाने व चिकित्सक पद्धतीने संशोधक वृत्ती जोपासणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जागतिक पातळीवर रोजगाराच्या प्रचंड संधी निर्माण झालेल्या आहेत. स्वतःच्या प्रगतीबरोबरच देशाचे नाव उज्ज्वल करण्यासाठी हा अभ्यासक्रम राजमार्ग आहे. या अभ्यासक्रमाद्वारे आंतरराष्ट्रीय कंपनी कोर्स शिकण्याची व योग्य प्रशिक्षणाअंती आरोग्य क्षेत्रामधील तज्ज्ञ होण्याची संधी संशोधक, विद्यार्थ्यांना प्राप्त होणार आहे.'

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'विद्यापीठ आणि होश्युल हॅनोव्हर विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने हा अभ्यासक्रम राबविला जात आहे. विद्यापीठातला हा तशा अर्थाने पहिलाच आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचा अभ्यासक्रम शिकण्याची संधी आपल्या विद्यार्थ्यांना उपलब्ध झालेली आहे.'

याप्रसंगी डॉ. कापडी, दानिगोंड यांनीही मनोगत व्यक्त केले. एम. एस्सी.-मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट अभ्यासक्रमाचे समन्वयक डॉ. के. डी. सोनवणे यांनी स्वागत केले. बायोकेमिस्ट्री अधिविभागप्रमुख डॉ. जे. पी. जाधव यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.

# SUK starts MSc in medical information management

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur**: The Shivaji University, Kolhapur (SUK), in association with its German academic counterpart Hochschule Hannover — University of Applied Sciences and Arts, inaugurated its first batch of MSc in information management course recently.

Professor Gerhard Fortwengel, Hochshule Hannover of the University of Applied Sciences and Arts, Germany, said that the course has the potential to create global employment opportunities.

TOI



Professor Gerhard Fortwenge speaking at the occasion

## CAMPUS BUZZ

### VIBGYOR High Awarded 'Number 1 Co-Ed Day School'

City-based VIBGYOR High has been ranked as 'Number 1 Co-Ed Day School' by Education-World India School Rankings. The school has bagged the award for fifth time in a row. Principal Snehal Narvekar received the award on the school's behalf.

### Western Maharashtra TPO summit held

City-based D Y Patil Engineering College organised the Western Maharashtra engineering pharmacy agriculture college's Training and Placement Officers (TPO) meet to promote 'Mission Rojgar' (employment) initiative. The meet was held on Sunday.

### DKTE professor awarded by ASMA India

Ichalkaranji-based DKTE Society's Textile and Engineering Institute's professor Ashish Hulle has been honoured with the Top Digital Marketer in Education Award.

The prestigious honour was presented by ASMA India (Adoption of Social Media in Academics).

# कोल्हापूरच्या संशोधकांनी शोधली ‘बेगोनिया’ची नवी जात



## ‘बेगोनिया हंडीबडगनाथेंसिस’ असे नामकरण

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

बेगोनिएसी कुळातील बेगोनिया प्रजातील एकमेव प्रजात असून त्यातील नवी जात शोधण्यात कोल्हापूरच्या संशोधकांना यश आले आहे. ही वनस्पती पश्चिम घाटातील हंडीबडगनाथ मठ (कर्नाटक) येथे आढळून आली. डॉ. मकरंद ऐतवडे यांनी प्रा. डॉ. एस. आर. यादव, डॉ. एम. वाय. बाचूळकर यांच्या मार्गदर्शनाखाली शोधलेल्या या वनस्पतीचे नामकरण ‘बेगोनिया हंडीबडगनाथेंसिस’ असे केले आहे.

पश्चिम घाटातील बेगोनिया प्रजातींचा अभ्यास हे पीएच. डी. च्या कामाचे संशोधन डॉ. मकरंद ऐतवडे तसेच त्यांचे मार्गदर्शक वनस्पतीतज्ज्ञ प्रा. डॉ. एस. आर. यादव आणि डॉ. एम. वाय. बाचूळकर यांनी केले. बेळगाव जिल्ह्यातील हंडीबडगनाथ मठ (ता. खानापूर) येथे ऑक्टोबर २०१४ मध्ये बेगोनियाची एक जात आढळली. भारतामध्ये ही एकमेव वनस्पती आहे, जिच्या पानांच्या बगलेमध्ये गुलिका अर्थात ट्युबरकल आहेत. त्यानंतरच्या संशोधनात ही जात नवीनच असून पश्चिम घाटातीलच बेगोनिया डायपेट्याला या जातीशी आप्तभाव दर्शवत असल्याचे आढळून आले. या नवीन जातीच्या शोधाबाबतचा शोधनिबंध न्यूझीलंडमधून प्रकाशित होणाऱ्या ‘फायटोटॅक्सा’ या आंतरराष्ट्रीय नियतकालिकामध्ये नुकताच प्रसिद्ध झाला.

▶▶ पान २ वर

## व्यावसायिकदृष्ट्या उत्पादनाची गरज


### व्यावसायिकता हवी



या वनस्पतीची फुले देखणी असून नैसर्गिकरीत्या गुलिकाद्वारे तिचे सहज शाकीय प्रजजन होते. त्यामुळे व्यावसायिकदृष्ट्या शोभिवंत म्हणून प्रसिद्धीस येऊ शकते. त्यासाठी यापुढे प्रयत्न करण्याचा मानस आहे.

**- डॉ. मकरंद ऐतवडे**

### संरक्षण महत्त्वाचे



शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागाने अनेक यशस्वी प्रकल्प राबविले आहेत. लुप्त होत चाललेल्या बेगोनियाच्या भारतीय जातींचे संरक्षण आणि संवर्धन करण्याची गरज आहे.

**- डॉ. श्रीरंग यादव**

### पश्चिम घाटाचे जतन



पश्चिम घाट हा जैवविविधतेने समृद्ध आहे. अनेक नवीन वनस्पतींचे शोध अलीकडच्या काळात पश्चिम घाटामधून लागले आहेत. पश्चिम घाटाचे जतन आणि संवर्धन करणे ही काळाची गरज आहे.

**- डॉ. मधुकर बाचूळकर**